# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# पुणे वृत्तांत
# वेळ - संध्याकाळी 06.00 वा.

**दिनांक- 13.01.2025** **वार- सोमवार**

---

**केंद्रीय मंत्री राजीव रंजन सिंह**

देशातील ग्रामीण क्षेत्रातील आर्थिक स्थिती मजबूत करण्यासाठी पशुधन विकास महत्वपूर्ण घटक आहे; पशुधन वाढीच्या माध्यमातून उत्पादन वाढवल्यास ग्रामीण अर्थव्यवस्था निश्चितच सुधारेल, असा विश्वास केंद्रीय मत्स्यपालन, पशुसंवर्धन आणि दुग्धव्यवसाय मंत्री राजीव रंजन सिंह यांनी आज पुण्यात व्यक्त केला. पिंपरी चिंचवडमध्ये झालेल्या उद्योजकता विकास परिषदेत ते बोलत होते. एक हजार उद्योजक, लाभार्थी, शेतकरी आणि उद्योग संघटना या परिषदेत सहभागी झाले आहेत. केंद्रीय मत्स्यपालन, पशुसंवर्धन दुग्धव्यवसाय राज्यमंत्री एस.पी सिंग बघेल, राज्याच्या पशुसंवर्धन मंत्री पंकजा मुंडे यांच्यासह इतर मान्यवर या कार्यक्रमाला उपस्थित होते.

ग्रामीण तरूणांमध्ये उद्योजकतेबाबत जनजागृती करणं आवश्यक असून ग्रामीण भागातील अधिकाधिक युवकांनी उद्योजकतेकडे वळलं पाहिजे, असं पंकजा मुंडे म्हणाल्या.

**निवडणूक कार्यशाळा**

राज्याचे मुख्य निवडणूक अधिकारी एस. चोक्कलिंगम यांच्या अध्यक्षतेखाली ईव्हीएम आणि व्हीव्हीपॅटच्या बर्न्ट मेमरी, मायक्रो कंट्रोलरच्या तपासणी आणि पडताळणी प्रक्रियेच्या अनुषंगाने पुण्यात यशदा इथं आज कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती. निवडणूक प्रक्रियेवरील नागरिकांचा विश्वास वृद्धिंगत व्हावा यासाठी ही प्रक्रिया पारदर्शक पद्धतीने राबवा, असे निर्देश चोक्कलिंगम यांनी यावेळी दिले. राज्याचे अतिरिक्त मुख्य निवडणूक अधिकारी किरण कुलकर्णी, भारत निवडणूक आयोगाचे अवर सचिव कनिष्क कुमार, पुण्याचे जिल्हाधिकारी डॉ. जितेंद्र डूडी यांच्यासह राज्यातील सर्व जिल्हाधिकारी, भारत इलेक्ट्रॉनिक्स लिमिटेडचे अभियंता यावेळी उपस्थित होते.

लोकसभा निवडणुकीबाबत सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल होती. त्याबाबत न्यायालयाने पक्षकारांचे म्हणणे ऐकून ईव्हीएम पूर्णतः विश्वसनीय असल्याचा निकाल दिला. याबरोबरच लोकांच्या ईव्हीएममधील मायक्रोकंट्रोलर चीपबाबत ज्या तक्रारी, शंका आहेत त्या देखील दूर व्हाव्यात यासाठी यंत्रणा निर्माण करावी, असे निर्देश न्यायालयाने निवडणूक आयोगाला दिले. त्यादृष्टीने आयोगाने बीईएलच्या साहाय्याने ईव्हीएम आणि व्हीव्हीपॅटच्या बर्न्ट मेमरी, मायक्रो कंट्रोलरच्या तपासणी आणि पडताळणीसाठी तांत्रिक प्रमाणित कार्यपद्धती तयार केली असल्याचं चोक्कलिंगम यांनी सांगितलं. यावेळी बीईएलच्या अभियंत्यांनी या तांत्रिक कार्यपद्धतीबाबत सादरीकरण केलं, तसंच ईव्हीएमच्या बॅलेट युनिट, कंट्रोल युनिट आणि व्हीव्हीपॅटच्या पडताळणीचं प्रात्यक्षिक करून दाखवलं.

**बातम्यावेळ**

महाकुंभ मेळ्याला आजपासून उत्तर प्रदेशात प्रयागराज इथं पौष पौर्णिमेच्या पहिल्या अमृत स्नानाने सुरुवात झाली. उद्या सकाळी होणाऱ्या अमृत स्नान सोहळ्याचं थेट प्रसारण आकाशवाणीच्या मुंबई केंद्रावरून सहक्षेपित केलं जाणार आहे, त्यामुळे आकाशवाणीच्या पुणे केंद्रावरून 7 वाजून 10 मिनिटांनी प्रसारित होणारं प्रादेशिक बातमीपत्र उद्या सकाळी पावणे सात वाजता प्रसारित केलं जाईल.

**<u>पुणे मनपा</u>**

पुणे महापालिकेच्यावतीने  देण्यात येणाऱ्या शैक्षणिक शिष्यवृत्तीचे पैसे लवकरच विद्यार्थ्यांच्या खात्यात जमा होतील असं महापालिकेचे उपायुक्त आणि समाज विकास विभागाचे प्रमुख नितीन उदास यांनी सांगितलं. महापालिकेच्या वतीनं दहावीमधील विद्यार्थ्यांना मौलाना अबुल कलाम आझाद आणि बारावीच्या विद्यार्थ्यांना लोकशाहीर अण्णा भाऊ साठे अर्थसहाय्य योजनेंतर्गत विशेष शिष्यवृत्ती दिली जाते. या योजनेसाठी आलेल्या १३ हजार ६३८ अर्जापैकी ११ हजार विद्यार्थ्यांचे अर्ज पात्र ठरले आहेत. दहावीतील पात्र विद्यार्थ्यांना 15 हजार तर बारावीतील विद्यार्थ्यांना 25 हजार रुपयांचं अनुदान दिलं जातं.

**<u>अंकनाद</u>**

पुणे महापालिकेच्या शाळांमधील इयत्ता पहिली ते आठवीच्या मुलांचा गणिताचा पाया चांगला करण्यासाठी अंकनाद गणिताची सात्मीकरण प्रणाली राबवली जाते, या प्रणालीचं साहित्य निविदा प्रक्रिया राबवूनच विकत घेणार असल्याचं प्रशासनानं स्पष्ट केलं आहे. कोणतीही निविदा प्रक्रिया न राबवता  १ कोटी ३४ लाख रुपयांचं हे काम एका संस्थेला दिलं जाणार होतं. यासाठी निधी नसल्याने शिक्षण विभागाकडून महापालिकेच्या शाळांमधील गुणवंत मुलांना देण्यात येणाऱ्या बक्षिसांच्या रकमेतून हा निधी वर्गीकरणाद्वारे उपलब्ध करून देण्याचा प्रस्ताव स्थायी समितीसमोर ठेवण्यात आला आहे.

**<u>स्वच्छता</u>**

स्वच्छ महाराष्ट्र आणि भारत अभियान नागरी अभियाना अंतर्गत पिंपरी चिंचवड महापालिकेच्या वतीनं शहरातून वाहणाऱ्या मुळा, पवना आणि इंद्रायणी नदीच्या घाटांवर स्वच्छता मोहीम राबवण्यात आली. यावेळी १० हजार ४४५ किलो कचरा संकलित करण्यात आला. येत्या १८ आणि २५ जानेवारी रोजी देखील शहरात विविध ठिकाणी स्वच्छता मोहीम राबविण्यात येणार आहे.

**<u>हवामान</u>**

पुणे आणि परिसरात आज 17 पूर्णांक 1 दशांश अंश सेल्सियस किमान तापमान नोंदवलं गेलं. उद्या किमान 17 अंश तर कमाल 28 अंश सेल्सियस तापमान राहण्याचा अंदाज पुणे वेधशाळेनं वर्तवला आहे.

हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू विविध भारती पुणे केंद्रावर, ताज्या पुणे **<u>वृत्तांतमध्ये, संध्याकाळी सहा वाजता, नमस्कार.</u>**